दिव्य मराठी

यवतमाळ 30-11-2021

# मतदार नोंदणी व जनजागृती अभियान

**प्रतिनिधी** | वनोजा



अभियान राबवताना रासेयाचे पदाधिकारी व महाविद्यालयातील शिक्षक वर्ग.

श्रीमती साळुंकाबाई राऊत कला व वाणिज्य महाविद्यालय वनोजा येथे मतदार नोंदणी व जनजागृती अभियान राबवण्याबाबत आले. महाराष्ट्र राज्य, मुख्य निवडणुक अधिकारी, संगाबा अमरावती विद्यापीठ अमरावतीच्या रासेयोचे संचालक डॉ. बुरुंगे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून राबवण्यात आला. महाराष्ट्र शासनाने १ जानेवारी २०२२ रोजी वा त्यापुर्वी १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या सर्व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना मतदार यादीत नाव नोंदणी करण्याकरिता १ नोव्हेंबर तर ते ३० नोव्हेंबर पर्यंत हे अभियान राबवण्याचे ठरवले आहे. यामध्ये ५० विद्यार्थ्यांची नावे देण्यात आली. तसेच विद्यार्थ्यांना आपल्याला ग्राम पंचायतीमध्ये मतदार नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी व प्राध्यापकांनी रॅली काढून जनजागृती केली. कार्यक्रमाला प्रा. डॉ. देवेंद्र गावंडे, प्रा. पी एन. लहासे, डॉ. गजानन घोंगटे, प्रा.जे एम. भगत मॅडम, प्रा. डी. डी. भगत, डॉ. एस. एस.बोरचाटे, डॉ. एस. एस. कडू, इ.प्राध्यापक व रासेयो स्वयंसेवक तसेच कार्यक्रम अधिकारी प्रा. बी. एस. डोंगरे सरपंच डॉ. श्रीराम मुखमाले, ग्रा. पं. सदस्य गोवर्धन पाटील आदी उपस्थित होते.